उपोद्घात

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा 31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठी चा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात वर्ष 2014-15 ते 2018-19 या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने राबविलेल्या 'भूपृष्ठ सिंचनातील परिणाम' यावरील निष्पादन लेखापरीक्षणाचे महत्वपूर्ण परिणाम समाविष्ट आहेत. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 आणि त्या अंतर्गत निर्गमित लेखापरीक्षा व लेखा विनियम, 2007 यांच्या तरतुदींतर्गत लेखापरीक्षण केले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 (2) अन्वये हा अहवाल राज्य विधानमंडळासमोर मांडणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे द्वारे निर्गमित लेखापरीक्षा मानके (मार्च 2017) यांच्यानुसार केले आहे.

टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित भाषांतरित अहवालामध्ये शंका असल्यास इंग्रजी अहवाल अधिकृत समजण्यात यावा.